परिपत्रक क्रं. ५४

झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरण

क्रमांक : झोपुप्रा/मुकाअ/परिपत्रक/स.सभा/2003/50
गृहनिर्माण भवन,५ वा माळा,
बांद्रा-पूर्व,मुंबई-४०० ०५१.
दिनांक : २५/०८/२००३

## परिपत्रक

विषय : सहयोगी सभासदत्वाबाबत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदी नूसार कोणत्याही व्यक्तीस नाममात्र सदस्य, सहयोगी सदस्य किंवा हितैषी सदस्य म्हणून दाखल करून घेण्यास परवानगी आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतंर्गत परिशिष्ट-२ मधील पात्र सभासदच फक्त सदनिका मिळण्यास पात्र असल्याने परिशिष्ट-२ मध्ये समाविष्ट नसलेल्या व्यक्तीचा संस्थेच्या कारभारात भाग घेणे/ हस्तक्षेप करणे उचित नाही. त्यामुळे या योजनेच्या मूळ उद्देशासच बाधा येण्याची शक्यता असल्याने ज्या व्यक्तीचे नाव परिशिष्ट-२ मध्ये नाही अशा व्यक्तीस सहयोगी सभासद करून घेण्यापूर्वी या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. तसेच ज्या संस्थांच्या उपविधीत अशी तरतूद नसेल, त्या संस्थांनी अशी तरतूद करून योग्य ती पोटनियम दुरूस्ती करून तसा प्रस्ताव मान्यतेसाठी प्राधिकरणाकडे तात्काळ पाठवावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण